Sakal, Wednesday, 15th June, 2011, Page No. 4

# खग्रास चंद्रग्रहणाची आज पर्वणी

» पान १ वरून

त्यामुळे उद्याचे ग्रहण अधिक गडद ठरण्याची शक्यता आहे, अशी माहिती खगोलशास्त्र अभ्यासकांनी दिली.

बुधवारी रात्री ११ वाजून ५२ मिनिटांनी ग्रहणस्पर्श सुरू होईल. त्यानंतर १२ वाजून ५२ मिनिटांनी चंद्र पूर्णपणे पृथ्वीच्या छायेत जाईल. तिथून खग्रास अवस्थेतील चंद्राचा प्रवास १०० मिनिटे पाहण्यास मिळेल. रात्री २ वाजून ३३ मिनिटांनी चंद्र पृथ्वीच्या छायेतून बाहेर पडायला लागेल आणि ३ वाजून ३२ मिनिटांनी ग्रहण सुटेल. चंद्र सध्या धनू आणि वृश्चिक राशींजवळ असल्याने वृश्चिकाची नांगी रात्री १ वाजून ३३ मिनिटांच्या सुमारास स्पष्ट दिसू शकेल. हे ग्रहण मध्य आशिया, पश्चिम आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि युरोपमध्येही दिसणार आहे. या विषयी 'आयुका'चे अरविंद परांजप्ये, खगोलशास्त्र अभ्यासक डॉ. प्रकाश तुपे म्हणाले, "खग्रास चंद्रग्रहणाचा जास्तीत जास्त कालावधी १०७ मिनिटे असू शकतो. उद्या १०० मिनिटे ग्रहण असेल. यापूर्वी १६ जुलै १९३५ रोजी १०१ मिनिटे, ६ जुलै १९८२ व १६ जुलै २००० रोजी १०७ मिनिटे खग्रास ग्रहण दिसले होते. यानंतर २७ जुलै २०१८ रोजीही खग्रास अवस्था मोठी म्हणजे १०६ मिनिटे असेल. सध्या सूर्य-पृथ्वी अंतरही थोडे जास्त झाले आहे. या सर्व कारणांमुळे मोठे ग्रहण होणार आहे."

परांजप्ये म्हणाले, "ज्वालामुखीच्या राखेमुळे चंद्र अधिक काळा दिसेल. ग्रहणाची गडदता हौशी निरीक्षकही एक ते चार या प्रमाणात मोजू शकतील. फ्रेंच खगोलशास्त्रज्ञ आंद्रे लुई दानजोन यांनी सुचविलेल्या या पद्धतीनुसार चंद्र जवळजवळ दिसेनासा झाल्यास शून्य मोजावे. राखाडी किंवा तपकिरी रंगाचा दिसल्यास एक, गडद लाल, मध्यभागी पृथ्वीची गडद सावली, चंद्राचे विवर दिसल्यास दोन, विटकरी रंगाचा, पिवळसर झाक असलेला दिसला तर तीन, नारंगी किंवा केशरी रंग आणि छायेला निळसर झाक, प्रखर परिघ दिसल्यास चार मोजावे." हौशी निरीक्षकांनी आपल्या निरीक्षणांची वेळ आणि रंग नोंदवून आयुकात कळवावे, असे आवाहनही परांजप्ये यांनी केले. आकाश निरभ्र राहिल्यास विविध संस्थांनी हौशी आकाश निरीक्षकांसाठी ग्रहण निरीक्षणासह विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. ज्योतिर्विद्या परिसंस्थेतर्फे केसरीवाड्याच्या गच्चीवर रात्री १०.३० वाजल्यापासून, तर आकाशमित्र संस्थेतर्फे जंगली महाराज रस्ता परिसरातील डॉ. श्रीकांत केळकर यांच्या रुग्णालयाच्या गच्चीवरून दुर्बिणीच्या साहाय्याने ग्रहण पाहण्याची सोय केली आहे. टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलमधील तारांगणातही रात्री ११ पासून व्याख्यान व त्यानंतर दुर्बिणीतून ग्रहण दाखविण्यात येणार आहे.

Page No. 1

# खग्रास चंद्रग्रहणाची आज पर्वणी

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १४ : चांदणे शिंपीत जाणारा पौर्णिमेचा पूर्णचंद्र बुधवार-गुरुवार मध्यरात्री मात्र झाकोळून जाणार आहे. आकाशातील लपाछपीचा आणखी एक दीर्घांक बुधवारी रात्री उलगडणार आहे. मृग नक्षत्रावर बरसणाऱ्या वरुणराजाने कृपा केली तर पृथ्वीच्या गडद छायेतील चंद्राच्या पूर्णबिंबाचे तब्बल १०० मिनिटे निरीक्षण करण्याचा योग उद्या जुळून येत आहे.

या ग्रहणात चंद्रावरील विवरेही दिसण्याचा दुर्मिळ योग साधला जाणार आहे, तसेच भुजंगधारी तारकासमूहातील एका ताऱ्याचे पिधानही निरीक्षकांना दुर्बिणीच्या साहाय्याने पहाता येणार आहे. अलीकडे झालेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकांमुळे उसळलेल्या धूलिकणांमुळे चंद्र अधिक काळसर दिसण्याची शक्यता आहे. पान ४ वर

## दुर्बिणीतून दिसणार पिधान

**ग्रहणात भुजंगधारी तारकासमूहातील ५१ क्रमांकाचा तारा चंद्राआड लपून पिधान होईल. रात्री ११.२९ मिनिटांनंतर दुर्बिणीतून हे दृश्य दिसेल. रात्री एक वाजून एक मिनिटाने तारा बाहेर येईल. त्या वेळी चंद्र खग्रास अवस्थेत असेल, त्यामुळे हे पिधान अधिक स्पष्ट दिसेल, असे तुपे यांनी सांगितले.**

